# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.03.2025** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज छत्तीसगढ आणि ओडिशाच्या दौऱ्यावर
2. महाराष्ट्रातील नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर कुंभमेळा प्राधिकरण कायदा करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा
3. देशातील आकांक्षित जिल्ह्यांमध्ये शंभर दिवसांची क्षयरोग निर्मूलन मोहीम सुरू आणि
4. कबड्डी विश्वकरंडक स्पर्धेत भारताला पुरुष आणि महिला गटात विजेतेपद

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज छत्तीसगढ आणि ओडिशाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादारम्यान, राष्ट्रपती छत्तीसगढ विधानसभेच्या रजतजयंती समारंभाला रायपूर इथं उपस्थित राहतील. इथल्या आमदारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या उद्बोधन वर्गाला त्या मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर ओडिशामधील नयागढ इथं त्या भारतीय विषवाबसू शाबर समाजाच्या स्थापनादिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**मुख्यमंत्री-नाशिक**

'महाराष्ट्रातील नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर कुंभमेळा प्राधिकरण कायदा करण्यात येईल', अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिकमध्ये दिली. कुंभमेळा तयारीचा आढावा घेतल्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. देशातील बारा जोतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर विकासासाठी सर्वंकष प्रयत्न केले जातील. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगानं त्र्यंबकेश्वर परिसराच्या धार्मिक, सामाजिक, पर्यावरणीय विकासासाठी तयार केलेल्या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यातील कामांना मंजुरी घेऊन सुरूवात करावी, असे निर्देश त्यांनी दिले. गोदावरी नदीच्या शुध्दीकरणासाठी खासगीकरणातून कामं केली जाणार आहेत; तसंच कुशावर्त तीर्थाचं पाणी शुध्द करण्यासाठी नगरपालिकेला सूचना देण्यात आल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं. दरम्यान फडणवीस यांनी काल त्र्यंबकेश्वर मंदिराला तसंच कुशावर्त तीर्थ इथं भेट देऊन पूजा केली. तसंच विविध आखाड्यांच्या साधु महंतांशीही संवाद साधला.

**क्षयरोग**

आज जागतिक क्षयरोग निर्मूलन दिन आहे. दरवर्षी 24 मार्च रोजी क्षयरोगामुळे आरोग्यावर होणारे विनाशकारी परिणाम आणि त्यामधून उद्भवणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक समस्या यांच्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि या जागतिक पातळीवर गंभीर ठरलेल्या साथीच्या रोगाचं निर्मूलन करण्याच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी हा दिवस पाळला जातो. 1882 मध्ये याच दिवशी डॉ. रॉबर्ट कोच यांनी क्षयरोग अर्थात टीबीच्या जीवाणूंचा शोध लावला होता. त्याच्या वर्धापन दिनानिमित्त हा दिवस पाळला जातो.

या वर्षीच्या क्षयरोग निर्मूलन दिनाचं सूत्र 'होय ! आपण क्षयरोग संपवू शकतो : त्यासाठी वचनबद्ध व्हा, गुंतवणूक करा आणि त्याचा प्रसार करा' असं आहे. हे सूत्र औषध-प्रतिरोधक टीबीच्या वाढत्या धोक्याला सामोरं जात, त्याच्याशी लढा देऊन क्षयरोग निर्मूलनासाठी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चालू असलेल्या प्रयत्नांवर विचार करण्याची आणि त्याला सहाय्य म्हणून वचनबद्धत होण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्युक्त करणारं आहे.

केंद्र सरकारने सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये क्षयरोगाचं उच्चाटन करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये असुरक्षित आणि असंघटित समुदायांमध्ये क्षयरोगाचे रुग्ण शोधण्याचं प्रमाण वाढवणे, क्षयरोगाच्या रुग्णांना मोफत औषधे आणि निदानाची तरतूद करणे आणि पोषण सहाय्य म्हणून क्षयरोगाच्या पोषण योजनेअंतर्गत रुग्णाला दरमहा एक हजार रुपये देणे यांचा समावेश आहे. याशिवाय क्षयरोगाच्या बेपत्ता असलेल्या रुग्णांना शोधण्यासाठी, या व्याधीमुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी आणि नवीन लोकांना संसर्गापासून रोखण्यासाठी 33 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील यासाठी निश्चित केलेल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये शंभर दिवसांची क्षयरोग निर्मूलन मोहीम सुरू करण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं प्रकाशित केलेल्या जागतिक क्षयरोग अहवाल, 2024 नुसार, भारतात क्षयरोगाच्या संसर्ग दरात 17 पूर्णांक 7 दशांश टक्के घट झाली आहे. 2015 मध्ये प्रति एक लाख लोकसंख्येमागे 237 असलेलं हे प्रमाण 2023 मध्ये प्रति लाख लोकसंख्येमागे 195 पर्यंत खाली आलं आहे.

**संघ-मुंबई**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यंदा शंभर वर्षं पूर्ण होत आहेत; त्यानिमित्त अनेक कार्यक्रमांचं आयोजन केल्याची माहिती संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांनी दिली आहे. बंगळुरू इथं झालेल्या संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधींच्या तीन दिवसीय राष्ट्रीय सभेच्या समारोप प्रसंगी ते काल बोलत होते. यंदा विजयादशमीपासून विविध कार्यक्रम सुरू होतील, सामाजिक सौहार्द आणि राष्ट्रीय एकता वाढवण्यासाठी स्थानिक पातळीवर जनसंपर्क अभियान राबवलं जाणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**मोहीम**

जम्मू आणि काश्मीरमधील जम्मू भागातील कथुआ जिल्ह्याच्या घनदाट जंगलात सीमेपलीकडून घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांविरुद्ध सुरक्षा दलांनी कालपासून मोठी धडक मोहीम सुरू केली आहे. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानला लागून असलेल्या आंतरराष्ट्रीय सीमेपासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या सन्याल गावातील एका नर्सरीमध्ये असलेल्या कुंपणसदृश ठिकाणी दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली. माहिती मिळाल्यानंतर विशेष कारवाई गटाच्या पोलिस पथकानं शोध मोहीम सुरू केली. कर्मचारी परिसरात प्रवेश करत असतानाच दहशतवाद्यांनी त्यांच्यावर जोरदार गोळीबार सुरू केल्यामुळे चकमक सुरू झाली.

दरीच्या मार्गाने किंवा नव्यानं तयार केलेल्या बोगद्यातून घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. त्यामुळे या कारवाईत मदत करण्यासाठी तातडीनं अधिक लष्करी कुमक पाठवण्यात आली. सुमारे अर्धा तास चाललेल्या गोळीबारानंतर आणि तीव्र चकमकीनंतर कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही, असं संबंधित अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. सध्या अतिरिक्त दलांच्या मदतीनं या प्रदेशातील गस्त आणि टेहळणी अधिक कडक करण्यात आली आहे. काही गावातील लाकूड गोळा करणाऱ्या महिलांनी या क्षेत्रात आश्रय घेतलेले पाच दहशतवादी पाहिल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. गेल्या वर्षभरात उधमपूर, दोडा आणि किश्तवार जिल्ह्यांच्या दुर्गम भाग आणि

पुढे काश्मीरमध्ये पोहोचण्यासाठी कथुआ हा पाकिस्तानस्थित दहशतवाद्यांसाठी घुसखोरीचा एक प्रमुख मार्ग म्हणून वापरला जात असल्याचं गेल्या काही वर्षात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांवरून स्पष्ट होत असल्याचं भारतीय लष्करानं म्हटलं आहे.

**<u>संचारबंदी-नागपूर</u>**

महाराष्ट्रातील नागपूरमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या हिंसाचारानंतर लागू केलेली संचारबंदी आता पूर्णपणे उठवण्यात आली आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी काल दुपारी संचारबंदी पूर्णपणे उठवण्याचे आदेश जारी केले. गेल्या सोमवारी इथं झालेल्या हिंसक प्रकारानंतर 11 पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यापैकी काही भागातली संचारबंदी 20 मार्चला, तर आणखी काही भागातली संचारबंदी दोन दिवसांपूर्वी उठवण्यात आली होती. उर्वरित भागातली संचारबंदीही दुपारी उठवण्याचे आदेश पोलिस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी दिले. संवेदनशील भागात स्थानिक पोलिसांची गस्त सुरु राहील. तसंच बंदोबस्तही कमी होणार नाही, असं सिंघल यांनी सांगितलं.

**<u>न्यायमूर्ती वर्मा-मुंबई</u>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाच्या अंतर्गत चौकशीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर काल रात्री उशिरा प्रसिद्ध झाला. या अहवालात छायाचित्रं आणि चित्रफितींचाही समावेश आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती वर्मा यांचं स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयानं प्रसिद्ध केलं आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी वर्मा यांच्यावरच्या आरोपांच्या चौकशीसाठी तीन सदस्यांची अंतर्गत चौकशी समिती स्थापन केली असून न्यायमूर्ती वर्मा यांना कोणतंही न्यायालयीन काम देऊ नये, असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना दिले आहेत.

**<u>एमएसएमई</u>**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची उलाढाल आणि गुंतवणुकीबाबत येत्या 1 एप्रिलपासून लागू होणाऱ्या सुधारणांबाबची माहिती केंद्र सरकारनं जारी केली आहे. अडीच कोटी रुपयांपर्यंतची गुंतवणूक असलेले उद्योग आता सूक्ष्म उद्योग म्हणून गणले जातील. ही मर्यादा आधी 1 कोटी रुपयांपर्यंत होती. सूक्ष्म उद्योगांसाठीची उलाढालीची मर्यादा 5 कोटींवरुन 10 कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. 25 कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेल्या उद्योगांचा समावेश यापुढे लघु उद्योगांमध्ये होईल. ही मर्यादा यापूर्वी 10 कोटी रुपये होती.

**<u>झेलेन्स्की</u>**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांनी काल खार्कीव्ह इथं लष्करी अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत सीमाभागातील परिस्थिती आणि सौदी अरेबियात आज अमेरिकेसोबत होणाऱ्या बैठकीची तयारी यावर चर्चा झाल्याचं वृत्त स्थानिक माध्यमांनी दिलं आहे.

**<u>खेलो इंडिया पॅरा</u>**

खेलो इंडिया पॅरा क्रीडा स्पर्धेत काल पंजाबच्या जसप्रीत कौरनं भारोत्तोलनात नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली. 45 किलो वजनी गटात स्वतःचाच राष्ट्रीय विक्रम मोडून तिने शंभर किलोपेक्षा जास्त वजन उचललं. पुरुषांच्या 54 किलो वजनी गटात मनिषनं 166 किलो वजन उचलून नव्या राष्ट्रीय विक्रमासह सुवर्ण कामगिरी केली. जम्मू काश्मीरच्या शीतल देवीनं तीरंदाजीमध्ये सुवर्णपदक पटकावलं. महाराष्ट्राच्या आदिल मोहम्मद नाझिर अन्सारी यांने तीरंदाजीमध्ये पुरुषांच्या W1 प्रकारात आपलं वर्चस्व कायम राखत आणखी एक सुवर्णपदक पटकावलं. तीरंदाजीच्या रिकर्व्ह प्रकारात पुरुषांच्या

गटात झारखंडच्या विजय सुंदी यानं आणि महिलांच्या गटात हरियाणाच्या पूजानं सुवर्णवेध घेतला. नेमबाजीमध्ये महिलांच्या 10 मीटर एअर पिस्टल SH1 प्रकारात उत्तर प्रदेशच्या सुमेधा पाठक हिनं सुवर्ण पदक मिळवलं. तर पुरुषांच्या 10 मीटर एअर रायफल प्रोन SH2 प्रकारात महाराष्ट्राच्या सागर कटाळे यानं सुवर्णपदक पटकावलं.

**कबड्डी**

इंग्लंडमधील वुल्व्हरहॅम्प्टन इथं झालेल्या 2025 च्या पुरुष आणि महिला कबड्डी विश्वकरंडक स्पर्धेत भारताने विजेतेपद पटकावलं आहे. पुरुष संघानं काल अंतिम सामन्यात यजमान इंग्लंडचा 44-41 असा पराभव केला. यापूर्वी, भारतीय महिला संघानं त्याच ठिकाणी झालेल्या अंतिम सामन्यात इंग्लंडचा 57-34 असा दणदणीत पराभव केला. आशियाच्या बाहेर पहिल्यांदाच झालेल्या या स्पर्धेत बर्मिंगहॅम, कोव्हेंट्री, वॉल्सॉल आणि वुल्व्हरहॅम्प्टन इथं सामने पार पडले. 2019 मध्ये मलेशियानं आयोजित केलेल्या स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीत भारतानं पुरुष आणि महिला दोन्ही गटात विजेतेपद पटकावलं होतं.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**